सहायक कक्ष अधिकारी सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण व परीक्षा सन २०१८ साठी अर्ज मागविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः सेप्रप २०१८/प्र.क्र.४/का.१७

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
तारीख: ५ एप्रिल, २०१८.

शासन परिपत्रक-

महाराष्ट्र शासन दुय्यम मंत्रालय सेवा (सहायक) सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा नियम, १९७७ मधील तरतुदीनुसार सन २०१८ मध्ये आयोजित करावयाच्या प्रशिक्षण आणि परीक्षेसाठी प्रथमच बसण्यास पात्र असलेल्या उमेदवारांचे विहित नमुन्यातील अर्ज या परिपत्रकान्वये मागविण्यात येत आहेत.

२. सदर प्रशिक्षण आणि परीक्षेसाठी सादर करावयाचा विहित नमुन्यातील अर्ज मंत्रालयीन इंट्रानेटवरील "आवेदन पत्र" या शिर्षाखाली उपलब्ध आहे. तरी मंत्रालयीन विभागातील व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयातील जे सहायक कक्ष अधिकारी सन २०१८ च्या परीक्षेस पहिल्यांदाच बसण्यास पात्र आहेत आणि ज्यांचे प्रशिक्षण अद्याप झालेले नाही अशा सहायक कक्ष अधिकाऱ्यांचे विहित नमुन्यातील अर्ज आस्थापना अधिकाऱ्यांनी प्रमाणित करुन, या विभागाकडे **दिनांक ५ मे, २०१८ पर्यंत** पाठवावेत. सदर अर्जामध्ये उमेदवाराचा नियुक्ती दिनांक बरोबर असल्याची आस्थापना अधिकाऱ्यांनी खात्री करावी. विहित नमुन्यातील अर्जात उमेदवाराने आपले संपूर्ण नाव, नियुक्ती दिनांक, विभागाचे नाव इत्यादी तपशील अचूक नमूद करावा.

३. सदरहू परीक्षा नियमातील तरतुदीनुसार पात्र सहायक कक्ष अधिकाऱ्यांना प्रशिक्षण वर्गाचा लाभ फक्त एकदाच घेता येतो. त्यामुळे ज्या सहायक कक्ष अधिकाऱ्यांनी यापूर्वी सदर प्रशिक्षणाचा लाभ घेतला आहे त्यांना पुन्हा प्रशिक्षणाचा लाभ घेता येणार नाही. जे सहायक कक्ष अधिकारी यापूर्वी झालेल्या सहायक कक्ष अधिकारी सेवा प्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षेत अनुत्तीर्ण झाले आहेत किंवा सदर परीक्षेला अनुपस्थित राहिले आहेत त्यांचे सन २०१८ मधील सेवा प्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षेस बसण्यासाठीचे अर्ज, उपरोक्त नमूद प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर स्वतंत्रपणे मागविण्यात येतील त्यावेळी ते पाठविण्यात यावेत.

४. सदर परिपत्रक सर्व संबंधित सहायक कक्ष अधिकाऱ्यांच्या (प्रतिनियुक्तीवर/रजेवर असलेल्या सहायक कक्ष अधिकाऱ्यांसह) कृपया त्वरित निदर्शनास आणावे व त्यांची स्वाक्षरी घेऊन ते कागदपत्र आपल्या अभिलेखात जतन करुन ठेवावेत. संबंधित सहायक कक्ष अधिकाऱ्यांची नियुक्ती नियमित असल्याची आस्थापना अधिकाऱ्यांनी खात्री करावी. या संदर्भात काही त्रुटी राहिल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित आस्थापना अधिकाऱ्यांची राहील याची कृपया नोंद घेण्यात यावी.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१८०४०५१५५०२३१७०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Pandurang Wagh

Digitally signed by Rajendra Pandurang Wagh
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9e4468a63fe9f9f2a565a0790f46e3c14a3715b2370430433845720a9c4c8107, serialNumber=7adb1868a49b8719e27d3453044671a8ceddbd04af26dd2089ed03e6b1bd92bd, cn=Rajendra Pandurang Wagh
Date: 2018.04.05 15:51:22 +05'30'

(राजेंद्र वाघ)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,(पत्राने)
२. सर्व मंत्रालयीन विभाग (आस्थापना)
३. निवडनस्ती